25 वर्षे विकासाची
"माझे शहर, माझा अभिमान"

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## आयुक्त कार्यालय

मुख्यालय, २रा मजला, स्व. इंदिरा गांधी भवन, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प.)
दूरध्वनी क्र.०२२-२८१९२८२८ ई-मेल आयडी commissioner@mbmc.gov.in

जा.क्र. मनपा/ आयुक्त / ०९ /२०२६-२७ दि. ०१/०४/२०२६

**कार्यालयीन आदेश**

**विषय :** मा. मुख्यमंत्री यांचे शुभ हस्ते व दोन्ही मा. उपमुख्य मंत्री यांचे प्रमुख उपस्थित दि.3/4/2026 रोजी होणाऱ्या मेट्रो 9 च्या पहिल्या टप्याचे उद्धाटन सोहळया बाबत.

**संदर्भ:** मा. आयुक्त यांचे अध्यक्षतेखाली दि.01/04/26 रोजी पार पडलेल्या बैठकीतील निर्देश

मा. मुख्यमंत्री यांच्या शुभहस्ते व दोन्ही मा. उपमुख्यमंत्र्यांच्या प्रमुख उपस्थितीत शुक्रवार दि.03/04/2026 रोजी मिरा भाईंदर मेट्रो -9 च्या पहिल्या टप्प्यातील लोकार्पण कार्यक्रम आयोजित केलेला आहे.

मा. मुख्यमंत्री व दोन्ही मा. उपमुख्यमंत्री तसेच मंडळातील इतर मा. मंत्री, मा. आमदार या प्रसंगी शहरात उपस्थित रहाणार आहेत. सदर कार्यक्रमा दरम्यान पालिकेमार्फत करावयाच्या सोयी सुविधा बाबत आयुक्त महोदयांनी खालील प्रमाणे निर्देश दिले आहेत.

| अ.क्र. | कामाचे स्वरुप | विभाग | अंमलबजावणी करणारे अधिकारी |
|---|---|---|---|
| 1. | गानसम्राज्ञी लता मंगेशकर नाटयगृह उपलब्ध करुन देणे. | मालमत्ता व्यवस्थापन | श्री. सचिन पवार, उपअभियंता |
| 2. | नाटयगृह परीसर तसेच अंतर्गत साफ-सफाई करणे. | घनकचरा व्यवस्थापन | श्री. योगेश गुणीजन, सहा. आयुक्त |
| 3. | दहिसर चेक नाका ते गायमुख दुतर्फा रस्ता साफ-सफाई व डेब्रीज उचलून घेणे. | घनकचरा व्यवस्थापन | श्री. योगेश गुणीजन, सहा. आयुक्त |
| 4. | काशीगाव मेट्रो स्टेशनच्या परिसरात सखोल स्वच्छता अभियान राबवावे. | घनकचरा व्यवस्थापन | श्री. योगेश गुणीजन, सहा. आयुक्त |
| 5. | नाटयगृह परिसर व अंतर्गत झाडे, कुंडया याची निगा, साफ-सफाई करणे. | उद्यान व वृक्ष प्राधिकरण | श्री. नागेश विरकर, मुख्य उद्यान अधिक्षक |
| 6. | वाहतूक पोलीस अधिकारी यांचे समवेत समन्वय ठेवून दहिसर चेक नाका ते गायमुख रस्त्याच्या कडेला असलेले अनधिकृत फेरीवाले हटविणे व बेवारस वाहने उचलून घेणे. | अतिक्रमण व अनधिकृत बांधकाम नियंत्रण | श्री. नरेंद्र चव्हाण, सहा. आयुक्त<br>श्रीम. प्रियंका भोसले, सहा. आयुक्त, प्र.स.क्र.6<br>श्री. स्वप्निल सावंत, उपायुक्त तथा प्र.अ.क्र.4 |
| 7. | अनधिकृत बोर्ड/बॅनर हटविणे.<br>(मा. मुख्यमंत्री महोदयाच्या मागील कार्यक्रमादरम्यान दिलेल्या सुचना) | अतिक्रमण व अनधिकृत बांधकाम नियंत्रण | श्री. नरेंद्र चव्हाण, सहा. आयुक्त<br>(सर्व प्रभाग अधिकारी) |

| अ.क्र. | कामाचे स्वरुप | विभाग | अंमलबजावणी करणारे अधिकारी |
|---|---|---|---|
| 8. | विकास काम पूर्ण झाले आहे तेथील डेब्रीज उचलून घेणे. विकास कामे सुरु आहेत तेथे बॅरिकेटींग करणे. गटारावरील तुटलेली छाकणे बसविण्यात यावीत. | बांधकाम | श्री. सचिन पवार, उपअभियंता<br>श्री. यतिन जाधव,<br>प्र.उप अभियंता |
| 9. | मान्यवरांना देण्यासाठी भेट वस्तू व पालिका रौप्य महोत्सवी डायरी देणे. | भांडार व ग्रंथालय | श्रीम. कविता बोरकर,<br>उपायुक्त (ग्रंथालय)<br>श्रीम. मनस्वी म्हात्रे,<br>विभाग प्रमुख (भांडार) |
| 10 | मा. मुख्यमंत्री महोदय दौऱ्या दरम्यान ज्या ठिकाणाना भेट देण्याची शक्यता आहे तेथील कामांची तपासणी करणे. | विभाग प्रमुख (सर्व) | सर्व विभाग प्रमुख/खाते प्रमुख |

श्री. दिपक खांबीत, प्र.शहर अभियंता यांनी श्रीम. योजना पाटील, अधिक्षक अभियंता मेट्रो-9 यांचेशी समन्वय राखून पालिके संबंधित आवश्यकती कामे/उपाययोजना कराव्यात. सर्व खाते प्रमुखांनी आपल्या अधिनस्त विभागाकडे नेमून दिलेल्या कामावर नियंत्रण ठेवावे. नेमून दिलेल्या कामात कोणताही हलगर्जीपणा दुर्लक्षित केला जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

(**राधाबिनोद अ. शर्मा**, भा.प्र.से.)
आयुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका

**प्रति,**
**सर्व संबंधित अधिकारी**

प्रत:- आवश्यक कार्यवाहीसाठी
1. श्री. सचिन बांगर, उपायुक्त (मु.)
2. श्री. दिपक खांबीत, प्र.शहर अभियंता